## नियमित दिवाणी दावा क्र. ६२१/२०२२ मध्ये निशाणी क्र. २८ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र सरकारतर्फे जिल्हाधिकारी, सातारा यांच्यातर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर रोजी पारीत झालेला एकतर्फा प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन या प्रकरणात हजर होण्यास व लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ विरुद्ध दिनांक ०३/०४/२०२३ रोजी दावा एकतर्फा चालविण्याबाबतचा आदेश पारीत झाला आहे. त्यानंतर सुमारे दोन वर्षांचा कालावधी होऊन गेला आहे. प्रतिवादी क्र. १ चा प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादीवर अन्याय होऊन नुकसान होणार आहे व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्याकामी दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. १ यांच्यावर प्रस्तुत दाव्याच्या समन्सची बजावणी होऊनही ते याकामी हजर न झाल्याने प्रस्तुतचा दावा त्यांच्याविरुद्ध एकतर्फा चालविण्याबाबत निशाणी क्र. १ वर दिनांक ०३/०४/२०२३ रोजी आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ तर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०६/०५/२०२५ रोजी दाखल केला आहे. प्रकरणाचे स्वरुप आणि अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र. १ यांना या कामी हजर होण्याची व त्यांची लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे.

त्यामुळे वरील नमूद कारणांचा विचार करता माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व उचित आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार प्रतिवादी क्र. १ यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक ०३/०४/२०२३ रोजी पारीत केलेला एकतर्फा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ यांना या प्रकरणात हजर होण्यास व लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.05.08 17:21:40 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– ०८/०५/२०२५ 　　२रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.